# अनुक्रमणिका


| अ. क्र. | यशोगाथेचे नाव | महिलेचे नाव | लोकसंचालीत साधन केंद्राचे नाव | पृष्ठ.क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | विकासाच्या वाटेवर | मनीषा संजय मोरे | क्षितीज लोकसंचालित साधन केंद्र | ५-६ |
| २ | स्वप्न साकारताना | पुजा डोईफोडे | तनिष्का लोकसंचालित साधन केंद्र | ७ |
| ३ | आभाळ कवेत घेताना | माधुरी ठाणेकर | घे भरारी लोकसंचालित साधन केंद्र | ८ |
| ४ | परीक्षा | महानंदा तांबे | तनिष्का लोकसंचालित साधन केंद्र | ९ |
| ५ | वेड्यानीच इतिहास घडविला | पुजा व प्राजक्ता दळवी | घे भरारी लोकसंचालित साधन केंद्र | १० |
| ६ | समाज बदलत आहे | स्नेहा भालेराव | घे भरारी लोकसंचालित साधन केंद्र | ११ |
| ७ | उंबरठ्यावरून जगाकडे | मनीषा देसाई | घे भरारी लोकसंचालित साधन केंद्र | १२ |
| ८ | ओळख होत आहे | स्मिता माने | क्षितीज लोकसंचालित साधन केंद्र | १३ |
| ९ | अशक्य ही शक्य होते | अर्चना पाटील | घे भरारी लोकसंचालित साधन केंद्र | १४ |
| १० | प्रकाशयाच्या दिशेने | गौतमी खरात | घे भरारी लोकसंचालित साधन केंद्र | १५-१६ |
| ११ | नवी सुरवात | पिंकी कोळी | तनिष्का लोकसंचालित साधन केंद्र | १७ |
| १२ | इमिटेशन ज्वेलरी मध्ये चमकणारा तारा | आशा देसाई | स्वाभिमान प्रकल्प, मालाड | १८ |
| १३ | स्वप्ने फुलवणारी | सरिता माने | स्वाभिमान प्रकल्प, मालाड | १९ |
| १४ | परिवर्तन | दिप्ती बोत्रे | स्वाभिमान प्रकल्प, मालाड | २०-२१ |
| १५ | मुली स्पर्धा, महिला सक्षमीकरण | वर्षा | स्वाभिमान प्रकल्प, मालाड | २२ |
| १६ | विश्वासाला मार्ग अनेक | रुपाली माने | क्षितीज लोकसंचालित साधन केंद्र | २३ |
| १७ | शहर को और | असमा शेख | तनिष्का लोकसंचालित साधन केंद्र | २४ |
| १८ | सैर नव्या जगाची | सुशीला कुचेकर | क्षितीज लोकसंचालित साधन केंद्र | २५ |
| १९ | प्रेरणा | मनीषा प्रशांत निकम | तनिष्का लोकसंचालित साधन केंद्र | २६ |




Scanned with OKEN Scanner

# विकासाच्या वाटेवर

वो सोच रहा है, की उसको छू ही नही पाऊंगी जिंदगी मे कभी|

लेकिन ये जो आसमान को गुरुर है, इक दिन झुकेगा जरूर|



कोरोना महामारीत ज्यांची परिस्थिती बरी होती त्यांच्या समोरही पोटापाण्याचा प्रश्न उभा राहिला. कारण सगळा देशच घरात बसून होता. असल्फा वीलेज, घाटकोपर पश्चिमच्या जांभुळपाडा भागात राहणाऱ्या सौ. मनीषा संजय मोरे यांच्यावरही तसाच प्रश्न उभा राहिला. लॉकडाऊनपूर्वी त्यांचे पती संजय मोरे यांच्या खांद्यावर कायम असलेला आर्थिक भार यापूर्वी कधीही घराबाहेर न पडलेल्या मनीषा मोरे यांनी खांद्यावर घ्यायचा ठरवला. अर्थात त्यांचे पती संजय मोरे हे त्यांच्या पाठीशी पर्वत होऊन उभे होतेच.

कोरोनाचा प्रभाव जसजसा कमी होत गेला तसे प्रशासाने बंधनं शिथिल करायला सुरुवात केली. याच संधीचा फायदा घेत मनिषा यांनी महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत क्षितिज लोक संचलित साधन केंद्राच्या सहाय्याने ऑनलाईन प्रशिक्षण घेत वडापाव, दाबेली सारखे खाद्यपदार्थ ऑनलाईन विकायला सुरुवात केली. कोरोना प्रादुर्भावात अश्या खाद्यपदार्थांची प्रचंड मागणी होती. ह्याच संधीचं सोनं करत त्यांनी ग्राहक मिळवले. सोशल मीडियावर आपल्या व्यवसायाची जाहिरात करत त्या जास्तीत जास्त लोकांपर्यंत आपले पदार्थ पोहोचवण्याचा प्रयत्न करत होत्या. घरपोच सेवा मिळत आल्याने ग्राहकांना ते सुरक्षित आणि सोयीचं वाटत असल्याने त्यांना व्यवसाय वाढवण्यात यश मिळालं.

कोरोनाचा धोका टळला. हळूहळू रस्त्यावर रहदारी वाढू लागली तशी ऑनलाईन मागण्या कमी होऊ लागल्या. कोरोना चं संकट टळल्यानंतर खरतर सगळ्यांनाच नवी सुरुवात करावी लागणार होती. पण ही नवी सुरुवात म्हणजे नक्की काय? हा प्रश्नं मनिषा यांना भेडसावू लागला. संजय मोरे यांनी रस्त्यावर स्टॉल लाऊन खाद्यपदार्थ विकायचा सल्ला दिला. मनीषा मोरे यांना ही कल्पना आवडली सुद्धा. पण यासाठी लागणार होतं आर्थिक पाठबळ.



Scanned with OKEN Scanner

मनषिा यांना माविम अंतर्गत क्षतिजि लोक संचलति साधन केंद्र च्या सहयोगनिी उषा ताई यांना त्यांची कल्पना बोलून दाखवली. सहयोगनिी उषा ताई यांनी त्यांना  सारस्वत बँक या बँकेतून कर्ज स्वरूपात आर्थकि सहाय्य मळिवण्यासाठीचे प्रयत्नं सुरू केले. आणि बिघता बघता मरोळ येथे मनषिा यांचा खाद्यपदार्थांचा स्टॉल सुरू देखील झाला.

कोरोनाचं भय कमी होत गेलं तस तशी व्यवसायाने उचल घेतली. तीस चपत्यांपासून सुरू केलेला त्यांचा व्यवसाय आता चारशे ते सहाशे चपात्यांवर येऊन पोहोचलाय. अर्थात याला मनषिा यांची मेहनत आणि त्यांच्या अंगी असलेली स्वयंपाकाची कलाच कारणीभूत आहे.

सहयोगनिी ताईसोबत संवाद साधताना मनषिा म्हणतात "कुठलीही स्त्री दुबळी नसतेच कधी, तलिा जरासं पाठबळ मळिालं तर जग जकिण्याची हम्मित तच्या मनगटात असते."

# स्वप्न साकारताना

प्रत्येक अंधाऱ्या रात्रीला
एक स्वप्नांची खिडकी असते

एकविसाव्या शतकात विज्ञान क्षेत्रात प्रगतीच्या वाटा रुंदावत असताना रोजगाराच्या संधी मात्र तितक्याच वेगाने कमी होत जात आहेत. त्यामुळे तरुणाईला नोकरीच्या शोधात फिरत राहण्यापेक्षा स्वतःचा व्यवसाय असावा हे जास्त सोईचं वाटतं.

पूजा डोईफोडे या सुद्धा इतर मध्यमवर्गीय तरुणांसोबत महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करत असताना भविष्याची धेय्य आखत होत्या. पण त्या प्रवासात येणाऱ्या अडचणींवर मात करायची तयारी ही त्यांनी ठेवली होती. त्यांना स्वयंपाकाची आवड तर होतीच. पण नवनवीन गोष्टी करून पाहण्याचा त्यांना छंदच जडला. याच दरम्यान त्यांची संदीपजींसोबत ओळख झाली.

संदिपजींनी प्रेरणा युनायटेड आणि मुंबई सक्षम प्रोजेक्ट या दोन संस्थांशी पुजाजींचा परिचय करून दिला. या दोन्हीही संस्था स्त्रियांच्या आर्थिक सबलीकरणासाठी प्रयत्नशील आहेत हे कळल्यावर आपण योग्य ठिकाणी आलो आहोत याची त्यांना खात्री झाली. पुढे महिला आर्थिक विकास महामंडळाच्या प्रतिनिधींच्या माध्यमातून त्यांनी केक बनविण्याचे प्रशिक्षण घेत स्वतःचा व्यवसाय करायचा निर्णय घेतला. कुठलाही व्यवसाय उभा करायचा म्हणजे भांडवल आलं. पण पुजाजींच्या समोरचा हा प्रश्न महिला आर्थिक विकास महामंडळाच्या प्रतिनिधींनी लगेचच निकालाला लावला.

प्रेरणा युनायटेड या संस्थेकडून पुजाजींना व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणारे संपूर्ण उपयुक्त साहित्य पुरवले गेले. केक बनवण्यासाठी लागणारा कच्चा माल, ओवेन, बनविण्याची पद्धत, त्याचे प्रशिक्षण हे सारं असूनही एका गोष्टीची कमी होती, ती म्हणजे ग्राहक. सुरुवात नेमकी कशी करावी या विचारात असतानाच पूजाजींना महिला आर्थिक विकास महामंडळाकडून पंधरा हजारांची पहिली ऑर्डर मिळाली. निमित्त होतं जागतिक महिला दिन.

आता त्यांना सोशल मीडिया मार्फत बऱ्याचश्या ऑर्डर येत असतात आणि हे काम करतांना त्यांना आनंद ही मिळतो. आता त्या म्हणतात की पूर्ण न होणं ही स्वप्नांची स्वाभाविकता असली तरी लढत राहणं हा आपला स्वभाव असायला हवा.



Scanned with OKEN Scanner

# आभाळ कवेत घेताना

माधुरी ठाणेकर म्हणजे माधुरी कलेक्शनस्, स्वाद खाजाना, आत्मनिर्भर फूड स्टॉल ह्या तिन्ही व्यवसायांच्या प्रोप्राइटर. यापूर्वी त्या घे भरारी CMRC (माविम) मधील संकल्प महिला बचत गट, टिळक नगर यातील एक सदस्य होत्या. अर्थात आजही आहेतच. पण सोबतच तीन तीन व्यवसायांच्या प्रोप्राइटर सुद्धा आहेत.

सहा सात वर्षापूर्वी त्या लेडीज गारमेंट शिवण्याचा व्यवसाय करत होत्या. इतर कुठलाही व्यवसाय करायचा अनुभव तेव्हा त्यांच्याकडे नव्हता. घे भरारी संस्थेशी संपर्कात आल्यानंतर मात्र अनेक व्यवसायिक मार्गदर्शन घेऊन उत्तम व्यवसायिक बनण्यासाठी त्यांचा प्रवास सुरू झाला. लहान सहान प्रदर्षणांपासून त्या राज्यस्तरिय प्रदर्शनात सहभागी होऊ लागल्या. त्या अनुभवांची गाठ मारत मारत अनेक छोट्यामोठ्या कॉरपोरेट कंपन्या, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ऑनलाइन व ऑफलाईन प्रदर्शनात त्यांचा सहभाग नोंदवत राहिल्या. तिथल्या अनुभवातून जगाच्या वेगाशी स्पर्धा करायची उर्मी त्या घेत राहिल्यात.कोरोना काळात देखील त्यांनी चॉकलेट, केक, मसाले, दुधाचे पदार्थ, ज्वेलरी, बॅग्स बनवणे यांसारखे अनेक कौशल्य विकासाचे कोर्सेस पूर्ण केले. नवनवीन गोष्टी नवनवीन कौशल्य शोधून ते आत्मसात करण्याचा प्रयत्न त्या नेहमी करत असतात.




2018 पासून त्यांनी पारंपरिक, नैसर्गिक औषधी गुण असलेले, घरगुती व स्वच्छतेने बनवलेले आयुर्वेदिक मुखवासचे पदार्थ विकण्याचा व्यवसाय सुरू केला. हे पदार्थ शरीरातील जीवनसत्त्वाची कमी भरून काढतात.. आज भारतभरात त्यांच्या प्रॉडक्टला मागणी आहे.

व्यवसायिक कोर्स डिझाईन करण्याविषयी एका कॉन्फरन्समध्ये बोलताना त्यांनी वर्ल्ड बँकेतील व मंत्रालयातील लोकांचे बचत गटातील महिलांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करून देश आत्मनिर्भर होण्यासाठी देशातली प्रत्येक महिला आत्मनिर्भर असायला हवी असे प्रेरणादायी वक्तव्य दिले. कारण महिला आत्मनिर्भर असतील तरच आपला देश प्रगत राष्ट्र बनू शकेल यात शंका नाही.

# परीक्षा

आयुष्यात परीक्षा देण्याची वेळ कधी येईल सांगता येत नाही. कोरोना महामारीत साऱ्या जगच संयमाच्या परीक्षेला सामोरं गेलं. यातून काहीजण हुशारीने बाहेर पडले तर कुणी आयुष्याला मुकले सुद्धा. अन् कित्येकांची परीक्षा आजही सुरूच आहे.



महानंदा तांबे यांच्या वाट्याला इतके भोग येतील याची त्यांना कल्पना नव्हती. लॉकडाऊनमध्ये पती सदानंद तांबे यांची नोकरी गेल्यानंतर महानंदा यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली. कुटुंबाचा भार एकट्याच्या खांद्यावर सांभाळणारे सदानंद तांबे आल्या परिस्थिती मुळे डगमगू लागले तेव्हा महानंदा ह्या पाठीशी खंबीरपणे उभ्या होत्या.

महानंदा तांबे या गृहिणी जरी असल्या तरी सुद्धा व्यवहारज्ञान असल्याने त्यांनी दोन वर्षांपासून महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत तनिष्का लोक संचालित केंद्रामुळे बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक बचत करायला सुरुवात केली होती. आलेल्या परिस्थितीत त्यांनी त्यांच्या पतीला आश्र्वस्थ करत त्यांनी बचत गटाच्या माध्यमातून युनायटेड वर्ड मुंबई या संस्थेची मदत घ्यायचं ठरवलं. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या प्रतिनिधींशी चर्चा करताना त्यांनी शिवांकामाचा अनुभव असल्याचं सांगताच प्रतिनिधींनी त्यांना शिवणकामासंबधीचं साहित्य पुराव्याचं वाचन दिलं.

टेलरिंग मशीन मिळताच त्यांनी लहान सहान शिवणकामाच्या ऑर्डर्स घ्यायला सुरुवात केली. आजच्या घडीला शिवणकामातून सहाशे ते सातशे रुपये रोज त्या कमवत आहेत. वयाच्या चाळीसाव्या वर्षी नोकरी सुटलेले सदानंद तांबे सांगतात "जेव्हा सगळेच पर्याय संपले होते तेव्हा माझी बायको आधार होऊन माझ्या पाठीशी उभी राहिली... देव करो जगातल्या प्रत्येक पुरुषाला अशीच खंबीर बायको मिळो."



Scanned with OKEN Scanner

# वेड्यानीच इतिहास घडविला



या धावत्या आणि स्पर्धेच्या युगात उद्योजक म्हणून उभं राहणं तरुणांसाठी इतकं काही सोप्प नाहीय. समृद्ध कुटुंबात जन्म घेतलेल्या व्यक्तींच्या हाती असलेल्या संधी आणि सुविधा उपलब्ध होत नसतील तर मात्र उद्योजक होण्याची स्वप्न पाहणं म्हणजे निव्वळ वेडेपणा ठरतो. पण हेच स्वप्नं पाहून ते सत्यात उतरवण्याच्या ध्यासाने पूजा दळवी आणि प्राजक्ता दळवी या दोघी बहिणी पछाडलेल्या. पण यांच्या वेडेपणाला महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत घे भरारी लोक संचलित साधन केंद्राची साथ मिळाली.

असंख्य संस्था या उद्योगात प्रतिस्पर्धी आहेत या गोष्टीची जाणीव असूनही त्यांनी ज्वेलरी बनवण्याचा व्यवसाय सुरू केला. त्यासाठी त्यांनी प्रथमतः ज्वेलरी बनवण्याचं प्रशिक्षण घेत त्याचा संपूर्ण अभ्यास सुरू केला. मेटल ज्वेलरी वजनाने जड असल्याने कांनाना त्रास होतो, कानांना टाके मारावे लागतात या गोष्टींची जाणीव झाल्यावर त्यांनी नवा प्रयोग करायचं ठरवलं. त्यांनी सोयीस्कर आणि हलक्या कागदाचा वापर करून दागिने बनवायला सुरुवात केली. त्यांनी मार्केटमध्ये दागिन्यांचा एक नवा ब्रँड आणला ज्याचं नाव होतं दिर्घा.

दीर्घा सामान्य ग्राहकांपर्यंत पोहोचवायचं तर त्याला माध्यम हवं होतं. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या प्रदर्शनाच्या माध्यमातून ते सहज उपलब्ध झालं. महालक्ष्मी, सरस सारख्या इव्हेंट मधूनही त्यांना ग्राहकांपर्यंत पोहोचता आलं.

वजनाने हलक्या, पर्यावरण पूरक, पाण्याने खराब न होणार्या आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या दागिन्यांची सध्या त्या सोशल मीडियाच्या माध्यमातून भारतभर विक्री करत आहेत. बाराखडी नेकलेस, पतंग, वारली हिएरींग्ज, कंदील, बैलजोडी, राजमुद्रा या त्यांच्या दागिन्यांना चांगलीच मागणी आहे.

बचत गटाच्या छोट्याश्या बचतीतून त्यांनी त्यांचं स्वप्नं पूर्ण करण्याचा ध्यास घेतला आणि आजच्या घडीला इतक्या कमी वयात त्या यशस्वी उद्योजकांच्या स्पर्धेत घोडदौड करत आहेत. स्वप्नांना सत्यात उतरवण्यासाठी नैराश्य झटकून स्वतःला रोज रोज नवी संधी देण्याची गरज आहे हे पूजा आणि प्राजक्ता दळवी यांच्या प्रवासातून शिकता येईल.



Scanned with OKEN Scanner

# समाज बदलतो आहे



स्नेहाताई भालेराव यांचा समाजातील तळागाळातील आणि मध्यमवर्गीय स्त्रीयांना आर्थिक बळ देण्याचा हा प्रवास जवळजवळ सोळा वर्षांपूर्वी म्हणजेच २००४ साली सुरू झाला

महिला आर्थिक विकास महामंडळाने (माविम) २००९-२०१० मध्ये "घे भरारी" फेडरेशनची स्थापना झाली. त्यानंतर स्नेहाताईंच्या कार्याला खूपच चांगली गती मिळाली. ज्या महीलांना त्यांच्या ऊत्पादनासाठी मार्केट हवं होतं अशा महिलांना एकत्र आणून त्यांचे प्रत्येकी बचत गट बनवले. स्नेहाताईंनी आजपर्यंत जवळजवळ तीनशे बचतगटांची स्थापना केली.

चेंबूर, घाटकोपर, ट्राम्बे, कुर्ला, अणुशक्तीनगर, सायन, वाशीनाका, विक्रोळी, मुलूंड, भांडूप या भागात त्यांनी कार्य केले. महिलांना फूड प्रोडक्ट ऊत्पादनाचे, त्याच्या प्रेझेंन्टेशनचे प्रशिक्षण दिले.

हे सगळ करत असताना खरी अडचण आली ती एक्झीबिशनमध्ये आणि स्टॉलमध्ये उभा राहून ते प्रोडक्ट विकण्याची....! पूर्वीच्या गरीब, अडाणी महिला अशाप्रकारे प्रोडक्ट विकायला लाजत होत्या, त्यांचा आत्मविश्वास कमी पडत होता....तर शिक्षित, मध्यमवर्गीय महिलांच्या अहंकाराला ठेच पोहचत होती. त्यांना दुकानात वा स्टॉलवर उभे राहून ते प्रोडक्ट विकण्याची लाज वाटत होती. पण स्नेहाताईंनी यावरही ऊपाय काढला. त्या स्वत: स्टॉलवर उभ्या राहून प्रोडक्ट विकू लागल्या.....

आजच्या डिजिटल युगात आजही स्नेहाताई महिलांना प्रोत्साहन म्हणून स्वत: एक्झिबिशन मध्ये भाग घेतात. जसे की, मंत्रालय, कॉर्पोरेट कंपनीज, झेप ऊद्योगिनी व्यासपीठामुळे "नमस्ते भारत" या एक्झीबीशन अंतर्गत घे भरारीचे प्रोडक्ट्स आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचले. दुबई येथे महिलांचे प्रॉडक्ट सँपल घेऊन मिटिंग मध्ये भाग घेतला. नमो वाईब्रन्ट एक्झीबिशनमध्ये जाऊन तेथील नवीन माहिती संकलित केली. याप्रकारे महिलांच्या आर्थिक ,मानसिक, शारीरिकदृष्ट्या सक्षमिकरणासाठी त्या कायम प्रयत्नशील राहिल्या आहेत.

प्रत्येक स्त्रीने विश्वास बाळगला आणि एकमेकांना मदत करून पुढे जायचा निर्धार केला तर प्रत्येक स्त्री आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल असा त्यांचा विश्वास आहे.



Scanned with OKEN Scanner

# उंबरठ्यावरून जगाकडे

कामराज नगर, घाटकोपर (पूर्व) येथील रहिवासी मनीषा देसाई गृहिणी म्हणून घर सांभाळताना कुटुंबाला आर्थिक हातभार म्हणून टिकल्याची पाकिटे पॅकिंग करणे, दिवे, तोरणं, राखी, बनवणे या सारखी कामं करत होत्या. या दरम्यान त्यांची स्नेहाताई भलेरावांशी ओळख झाली. स्नेहाताईंनी दिलेल्या माहितीचा त्यांच्यावर सकारात्मक प्रभाव पडला. स्नेहाताईंच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी साक्षी महिला बचत गट स्थापन करून तो घे भरारी लोकसंचालित साधना केंद्र (माविम) यांच्याशी जोडला. त्यानंतर त्या उत्तम प्रतिचे आणि चविष्ट पदार्थ बनवून जवळच्या लोकांमध्ये पाठवू लागल्या. लोकांना ते खूप आवडू लागले. पण हे पदार्थ जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी त्यांना एक मला एक माध्यम हवे होते आणि महिला बचत गटाच्या माध्यमातून त्यांचे पदार्थ लोकांपर्यंत पोहचवू लागल्या. वेगवेगळ्या दिवसात लोणचं, पापड, चटण्या, दिवाळी फराळ, भाकरी, चपाती, पुरणपोळी अश्या वेगवेगळ्या पदार्थांच्या ऑर्डर घेऊन व्यवसाय वाढीस प्रयत्न केला. काही वेळा अडचणी आल्या नुकसान ही झालं त्याच्यावर मात देऊन पुढे जाण्याचा प्रयत्न त्या करत राहिल्यात.



CMRC(माविम ) यांच्याकडून घे भरारी संस्था सक्षम मधून त्यां
उपयोग त्यांना स्टॉल लावण्यास झाला. महिला आर्थिक विकास मह
करायला सहकार्य केलं. वन स्टेशन वन प्रॉडक्ट या योजनेत त्या
ओळखल्या जातात.

महिला आर्थिक विकास महामंडळाने एका सामान्य गृहिणीला
नेऊन ठेवलयं. मनीषा देसाईंनी स्नेहाताईंसारखा मार्गदर्शक मिळाल
शोधायचा आहे. आणि तुमच्या मार्गावर तुमचा सोबती म्हणून महिला
असेल.

# ओळख होत आहे



मरोळ पाईप लाईन, अशोक नगर, अंधेरी ईस्ट विभागात राहणाऱ्या स्मिता विजय माने या सर्वसामान्य गृहिणी म्हणून संसार सांभाळत होत्या. २००४ मध्ये विभागातील एका संस्थेच्या बालवाडीत त्यांची शिक्षिका म्हणून नेमणूक झाली. त्यातून त्यांची ओळख शिला कांबळे यांच्याशी झाली. शिला कांबळे यांनी स्मिताजींना बचत गटाविषयी माहिती दिली. त्यांच्या माध्यमातून सहयोगीनी पेडणेकर याचं अशी स्मिताजींची ओळख झाली. अस्मिताजींनी विभागातील काही महिलांना एकत्र करून २००८ साली अस्मिता स्वयंसहाय्यता बचत गटाची स्थापना केली. महिला आर्थिक विकास महामंडळाशी सलग्न झाल्यावर स्मिताजींना नव्याने स्वतःची ओळख पटू लागली.

बचत गटाच्या माध्यमातून अस्मिता स्वयंसहाय्यता बचत गटाच्या महिला विविध पाककृती, खेळाच्या स्पर्धा मध्ये भाग घेवु लागल्या. या दरम्यान महिला आर्थिक विकास महामंडळाच्या घाटकोपर ऑफिसमध्ये सी. एम. आर. सी. च्या स्थापनेची संकल्पना मांडली गेली. सगळ्यांच्या संमतीने स्मिताजिंची क्षितिज्ञ लोक संचालित साधन केंद्राची अध्यक्षा म्हणून नेमणूक झाली. इथुनच खर्या अर्थाने महिला आर्थिक विकास महामंडळासोबतचा त्यांचा प्रवास सुरू झाला.

विभागात टाटा मेमोरियल ट्रस्ट तर्फे कॅन्सर कॅम्प आयोजित केला गेला त्यातही स्मिताजींनी चांगली कामगिरी बजावली. एल अँड टी मार्फत जनरल मेडिकल कॅम्प लावणे, केंद्र सरकारचे ज्वेलरीचे प्रशिक्षण लावणे, मिटकानचे नमकिन फूडचे ट्रेनिंग लावणे यांसारखे कितीतरी उपक्रम त्या विभागात राबवू लागल्या. त्यामुळे विभागातील इतर महिलांना त्या चांगल्या परिचयाच्या झाल्या.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने साकीनाका येथील सूक्ष्म लघु उद्योग येथे आयोजित केलेल्या बॅग बनवण्याचे ट्रेनिंग व परफ्यूम बनवण्याचे प्रशिक्षण घेऊन त्यांनी आणखी नव्वद महीलांना परफ्यूम बनवण्याचे प्रशिक्षण दिले. आता अस्मिता स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून त्या परफ्यूम बनवणे व त्याची विक्री करण्याचा व्यवसाय करत आहेत. माविम मुळे समाजात त्यांची ओळख निर्माण झाली व समजतील इतर घटकांकडून त्यांना आदर मिळत आहे असं त्या सांगतात. त्यांच्या प्रगतीचं सगळं श्रेय त्या माविम आणि यांच्याबाचात गटातील सहकारी महिलांना देतात.

# अशक्य ही शक्य होते

जळगाव जिल्ह्यातील अर्चना सुनील पाटील ह्या बारावी पर्यंत शिक्षण झालेल्या गृहिणी. त्यांचं बालपण जळगाव जिल्ह्यातच झालं असून लग्नानंतर त्या मुंबईतील धारावी विभागात स्थायिक झाल्या. मुलाचे शालेय शिक्षण सुरू झाले त्या दरम्यान त्यांच्या आयुष्यात आर्थिक संकटं येऊ लागली. आहे त्या परिस्थितीत मुलाच्या उज्वल भविष्याची स्वप्नं त्या पाहू लागल्या. पण त्याच्या भविष्यात त्याला कशाची कमी पडू नये या साठी त्यांनी स्वतः सुद्धा कमवायची तयारी केली.




त्यांनी पापड, लोणची यांसारखे घरगुती खाद्यप्रकार बनवायला सुरुवात केली. पण विक्रीसाठी माध्यम नसल्याने मुलाच्या शाळकरी मित्रांच्या पालकांना त्यांनी ते पदार्थ टेस्ट साठी पाठवायला सुरुवात करत हळू हळू ग्राहक जमवायला सुरुवात केली. कुण्या एका पालकांकडून त्यांना महिला बचत गटाच्या योजनांविषयी माहिती मिळाली. त्यांच्यासाठी ही योग्य संधी होती.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या प्रतिनिधींशी संवाद साधल्यानंतर त्यांनी हाच व्यवसाय पुढे न्यायचा निर्णय घेतला. त्यासाठी उज्वला महिला बचत गटाची स्थापना करत त्यांनी युथ फाउंडेशन द्वारे आयोजित केलेल्या तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिरात सहभाग घेतला. या प्रशिक्षणातून व्यवसायासंदर्भातील खूप गोष्टी त्यांना शिकायला मिळल्यात. जसे की व्यवसाय कशा पद्धतीने करायचा, अडचणीवर कशी मात करायची, ग्राहकांना आपल्या सेवांकडे आकर्षित कसे करायचे, पैशांची बचत करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती, आपल्या कामाची किंमत कशी काढायची, व्यवसायाला कायदेशीर मान्यता मिळविण्यासाठी लागणारी कागद पत्रे आणि आपल्या व्यवसाय संबंधी सरकारच्या योजना.

आता महिला आर्थिक विकास महामंडळाने आयोजित केलेल्या वेगवेगळ्या प्रदर्शनात ते त्यांचे पदार्थ ग्राहकांपर्यंत पोहोचवत आहेतच. त्या सोबतच त्या आता सोशल मीडियाच्या माध्यमातून अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्नात आहेत. त्यांचा हा प्रवास माविम सोबत आणखीच रुचकर होत जाणार इतकं मात्र नक्की.



Scanned with OKEN Scanner

# प्रकाशाच्या दिशेने

ये अंधेरी रात है फिर भी मगर,
कल सवेरा आयेगा ही तू न डर।

गौतमी राजू खरात या घाटकोपर, मुंबई येथे राहणाऱ्या मध्यमवर्गीय कुटुंबातल्या. आर्थिक परिस्थिती बेताची. अनेक संकटांना तोंड देत संसाराचा गाडा पुढे ओढताना काहीतरी करून दाखवण्याची उर्मी मनात होती. पण संकटांनी दाही दिशा वेढलेल्या. त्या परिस्थितीत राहणाऱ्या सगळ्यांच्याच आयुष्यात जवळजवळ सारखेच भोग येत होते. कुठूनतरी बचत गटाच्या योजनांची माहिती मिळाल्यावर त्यांनी परिसरातील इतर महिलांना एकत्र करून परिस्थिती विरुद्ध कंबर कसायचा निर्णय घेतला. आणि नाही हो म्हणता म्हणता त्यांना आणखी वीस महिलांची साथ लाभली आणि २६-९-२००९ रोजी त्यांनी बचत गटाची स्थापना केली.

बचत गटाची स्थापना तर केली, पण कार्यपद्धतीच्या अज्ञानातून प्रगतीचा मार्ग काही साधता येत नव्हता. यात मोलाचं सहकार्य लाभलं ते म्हणजे महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत क्षितिज लोक संचालित साधन केंद्रामध्ये मिळालेल्या प्रशिक्षण आणि मार्गदर्शनातून गौतमी यांच्या बचत गटाला पन्नास हजारांचे पाहिले कर्ज मिळाले आणि त्यांच्या स्वप्नांना नव्या पंखांची पालवी फुटली.

कर्जस्वरुपात मिळालेल्या रकमेतून त्यांनी उद्योगांसाठी कच्चा माल खरेदी केला. पापड, लहान मुलांचे कपडे, पालेभाज्यांची विक्री अश्या लहान सहान व्यवसायातून त्यांच्या उद्योगांची सुरुवात झाली. पण हे व्यवसाय सुरू असताना अडचणी येऊ लागल्या त्या म्हणजे महिलांच्या ठाई असलेल्या शैक्षणिक अज्ञानामुळे. गौतमी खरात यांच्या ही गोष्ट लक्षात आली तेव्हा त्यांनी व्यवसायात सोबत असलेल्या महिलांची अक्षर ओळख व्हावी यासाठी प्रयत्न सुरू केले. परिसरातील शाळकरी मुलांकडून प्रशिक्षण घेत त्यांनी बचत गटातील महिलांना लिहायला वाचायला शिकवले.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सहकार्याने पुढे गौतमी यांच्या बचत गटाला सारस्वत बँक ऑफ इंडिया या बँकतून दीड लाख रुपयांचे कर्ज प्राप्त झाले. या मिळालेल्या राशीतून त्यांनी नव्या व्यवसायात पाऊल ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यांनी खानावळ सुरू करत गरजूंना स्वस्त दरात पोटभर अन्न पुरविण्यास सुरुवात केली. आपल्या कुटुंबाचे पोट भरण्याच्या धडपडीने घराबाहेर पडलेल्या महिला आज अनेकांचे पोट भरत आहेत.



Scanned with OKEN Scanner

प्रगतीचे एक एक शिखर गाठत असताना त्यांना सारस्वत बँक ऑफ इंडिया कडून कर्जस्वरुपात आणखी दोन लाख रुपयांची रक्कम प्राप्त झाली. त्यांनी हाच व्यवसाय वाढवायचा ठरवत बालवाड्यांचे टेंडर प्राप्त केले. देशाचे उद्याचे भविष्य असणाऱ्या बाळांना पौष्टिक अन्न मिळावे यासाठी त्या कसोशीने झटत असताना त्यांनी आपापल्या कुटुंबालाही सुदृढ बनवण्याचा प्रयत्न सुरू ठेवलाय. त्यांच्या प्रयत्नांना यश येईलच या बद्दल शंका नाही.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या प्रयत्नांतून गौतमी यांच्या बचत गटाला हल्लीच नऊ लाख रुपयांचे कर्ज प्राप्त झाले आहे. त्यांच्या प्रगतीच्या दिशा अधिकाधिक रुंदावत जात असताना महिला आर्थिक विकास महामंडळ अनेक गौतमींना या प्रगतीच्या वाटा मोकळ्या करून देण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहे. कारण एखादी स्त्री घराबाहेर पडते तेव्हा ती स्वतःचाच नाही तर समाजाचा, देशाचा विकास घडवून आणते असा आमचा विश्वास आहे.

परिस्थितीला शरण जाऊन दारिद्र्यात खितपत पडलेल्या महिलांसाठी गौतमी राजू खरात या आदर्श ठरतील यात शंका नाही.



Scanned with OKEN Scanner

# नवी सुरवात

नव्याने सुरुवात करायची म्हणजे सुद्धा अनेक अडचणींना सामोरं जावं लागतं. झालेल्या चुका पुसून नवीन धोरणं अखायची तर सोबतचे अनेक जण मागचीच दुखणी उगाळत बसतात. त्यावर मात करत पुढे निघायचं तर भूतकाळातल्या सावल्या पाठ सोडत नाहीत.



पिंकी कोळी यांच्या बाबतीतही असंच काहीसं घडलं. त्या महिला शक्ति बचत गटाच्या सभासद आहेत. २०१८ या वर्षी त्यांनी महिला आर्थिक विकास महामंडळ तनिष्का लोक संचलित साधन केंद्र यांच्या सनिध्यातून घरगुती जेवण पुरवण्याचा व्यवसाय सुरू केला. पण भोवताली इतकी स्पर्धा असताना खाद्यपदार्थांच्या व्यवसायात जम बसवणं म्हणजे तारेवरची कसरत. त्यातही ग्राहक बांधून ठेवायला लागणारे कष्ट ते वेगळे. पण त्यांनी व्यवसाय सुरू केल्या पासून काहीच दिवसात त्यांचा जम बसला. एकदा आलेले ग्राहक वारंवार येऊ लागले. मासे, घावणे, कोंबडी वडे, या सारख्या घरगुती पद्धतीने बनवलेल्या लज्जतदार गोष्टींमुळे ग्राहकांचा ओघ वाढत होता. पण नियतीच्या मनात काहीतरी वेगळंच सुरू असावं बहुदा. वाऱ्याच्या वेगाने धावणारी माणसं बघता बघता घरात कोंडली गेली. कोरोना नावाच्या संकटाने आख्या जगाला वेढलेले असताना पिंकी यांना हाती आलेला व्यवसाय बंद करावा लागला.

पाहता पाहता काळ गेला. घरात कोंडलेली माणसं पुन्हा रस्त्यावर दिसू लागली. पुन्हा जगाने वेग घेतला. पिंकी कोळी यांनाही या धावत्या जगात थांबून चालणार नव्हतंच. २०२२ वर्षाच्या एप्रिल महिन्यात त्यांनी पुन्हा व्यवसाय उभा करायचा निर्णय घेतला. त्यासाठी त्यांनी बचत गटामार्फत त्यांना युनायटेड वे मुंबई अंतर्गत सक्षम फाउंडेशन कडून व्यवसायाकरिता किचन सेटअप किट ची मदत मिळाली . महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने पिंकी कोळी यांना लागणारे प्राथमिक साहित्य पुरवत  बँक ऑफ इंडिया कडून कर्ज स्वरूपात भांडवल उपलब्ध करून देण्यात आले. त्यांनी पुन्हा त्याच उत्साहाने व्यवसायाला सुरुवात केली. आणि पिंकी कोळी यांच्याकडे आज किमान रोजचे दोनशे ते तीनशे बांधलेले ग्राहक आहेत.

पिंकी सध्या काही महिला साथीदारांना घेऊन नवीन किचन करत व्यवसाय वृद्धिंगत करायचा विचार करतायेत. आपल्या जेवणाच्या चवीची तोंडभरून कौतुक करणारे ग्राहक समोर असतानाही त्यांना नजरेपासून खूप अंतरावर असणाऱ्या ग्राहकांपर्यंत ही आपले पदार्थ जावेत अशी त्यांची इच्छा आहे. त्या आता झोमॅटो सारख्या ऑनलाईन सर्व्हिस देणाऱ्या माध्यमांचा वापर करून एका नव्या आणि प्रगतीच्या जगात पाऊल ठेवणार आहेत. आणि तिथे त्यांच्या स्वप्नांना नवा आयाम अखला जाणार इतकं मात्र नक्की.



Scanned with OKEN Scanner

# इमिटेशन ज्वेलरीमध्ये एक चमकणारा दागिना

"आशा देसाई:



मुंबई मध्ये गजबजलेल्या शहरात, मालाड पूर्वेच्या मध्यभागी, आशा देसाई, स्वयंरोजगार महिला राहते. गेल्या तीन ते चार दशकांपासून, आशा इमिटेशन ज्वेलरीचे सुंदर दागिने बनवतात, हे कौशल्य तिने गेल्या काही पाच-सात वर्षांत मिळवले आहे.

आशाच्या प्रवासाला एक महत्त्वपूर्ण वळण मिळाले जेव्हा ती स्वामी समर्थ महिला बचत गटाचा एक भाग बनली, अदानी फाऊंडेशनच्या पुढाकाराने. या व्यासपीठामुळे तिला तिचा व्यवसाय वाढवण्याची आणि नवीन उंची गाठण्याची संधी मिळाली. सहा महिने फाऊंडेशनशी संलग्न राहिल्यानंतर आशाने एक धाडसी पाऊल पुढे टाकण्याचा निर्णय घेतला.

तिने HDFC बँकेकडून 9600 रुपये आणि E-SHG कडून अतिरिक्त 10000 रुपये कर्ज मिळवले. या आर्थिक वाढीमुळे तिला तिचा व्यवसाय वाढवण्यासाठी लागणारा कच्चा माल खरेदी करता आला. पण आशा तिथेच थांबल्या नाहीत. तिने पाच ते सात महिलांना कामावर ठेवले, त्यांना रोजगार दिला आणि त्यांना इमिटेशन ज्वेलरी बनवण्याची कला शिकवली.

आज आशाचा व्यवसाय भरभराटीला आला आहे. ती दर महिन्याला 100 ते 150 दागिन्यांचे उत्पादन करते, 6000 रुपयांचे स्थिर उत्पन्न मिळवते. परंतु तिचा प्रभाव तिच्या स्वतःच्या व्यवसायापलीकडे पसरतो. आशा इतर तीन महिलांनाही साहित्य पुरवते, त्यांना त्यांचा स्वतःचा उपक्रम सुरू करण्यास मदत करते. यातून तिला दर महिन्याला 1500 ते 2000 रुपये अतिरिक्त मिळतात.

आशा देसाईंची कथा ही त्यांच्या उद्योजकतेची आणि जिद्दीचा पुरावा आहे. मालाड पूर्वेतील एका स्वयंरोजगार ज्वेलर्सपासून ते यशस्वी व्यावसायिक महिलेपर्यंतचा आशाचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. तिची कथा पुढाकाराची शक्ती, कौशल्य विकासाचे महत्त्व आणि महिला सशक्तीकरणाचा प्रभाव यावर प्रकाश टाकते. एका महिलेचा दृढनिश्चय तिच्या समाजावर आणि त्यापलीकडे कसा प्रभाव पाडू शकतो याचे हे एक चमकदार उदाहरण आहे.



Scanned with OKEN Scanner

# "स्वप्ने फुलवणारी"



गोरेगाव पूर्वेच्या मध्यभागी, सरिता महेश माने यांचे जीवन प्रेम, समर्पण आणि आपल्या कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी आईच्या अतूट बांधिलकीचा पुरावा म्हणून उलगडले. दोन मौल्यवान मुलींसह, सरिताचे दिवस मातृत्वाच्या स्नेहाच्या धाग्याने विणले गेले होते, प्रत्येक पाऊल तिने तिच्या लहान मुलींना चांगले जीवन देण्याच्या इच्छेने प्रेरित केले होते.

तिच्या कौटुंबिक कल्याणासाठी संधींच्या शोधात, सरिताने अदानी फाऊंडेशन आणि त्यांचा परिवर्तनशील प्रकल्प, स्वाभिमान शोधला. सकारात्मक बदलाची क्षमता आत्मसात करून, तिने परिवर्तनाच्या प्रवासाची सुरुवात म्हणून सक्रियपणे सहभागी होण्याचे ठरवले. अदानी फाऊंडेशनचा अविभाज्य भाग असलेल्या श्रीकृपा बचत गटाशी सरिताने स्वतःला खूप गुंतवून ठेवले. हा समुदाय-चालित उपक्रम केवळ आर्थिक सहाय्य प्रणालीपेक्षा अधिक बनला; ते शिकण्याचे आणि वाढीचे व्यासपीठ बनले. बचत गटाच्या माध्यमातून सरिताने मौल्यवान ज्ञान आणि कौशल्ये आत्मसात केली ज्यामुळे तिच्या कुटुंबाचे भविष्य घडेल. श्रीकृपा बचत गटाच्या पाठिंब्याने सशक्त होऊन, सरिताने तिच्या मुलींच्या शिक्षणाचे आश्वासन देऊन 14,000 रुपयांचे कर्ज घेतले. तिचे समर्पण आणि कठोर परिश्रम दुहेरी हेतूने घेतले; तिने केवळ तिच्या कुटुंबाच्या तात्काळ गरजांसाठीच काम केले नाही तर तिच्या प्रिय मुलांच्या दीर्घकालीन कल्याणासाठीही गुंतवणूक केली.

सरिताची कथा ही आईचे प्रेम, लवचिकता आणि समुदाय-चालित उपक्रमांच्या परिवर्तनीय प्रभावाचे मार्मिक वर्णन आहे. अदानी फाऊंडेशनचा स्वाभिमान प्रकल्प आणि श्रीकृपा बचत गट हे आशेचे किरण बनले आणि सरिताला तिच्या प्रेमळ कुटुंबासाठी वचन आणि संधींनी भरलेल्या भविष्याकडे मार्गदर्शन केले.



Scanned with OKEN Scanner

# परिवर्तन

**“शिक्षण हा भविष्याचा पासपोर्ट आहे आणि दृढनिश्चय हे इंधन आहे जे तुम्हाला प्रवासात पुढे नेत आहे”**




मालाडच्या वस्तीत साईशा उद्योजकीय महिला स्वयं-सहायता बचत गट आहे. दिप्ती नेहमीच त्याच्या आउट ऑफ द बॉक्स कल्पनांसाठी ओळखली जाते. तिने तिच्या गटाला काही कल्पना सुचवल्या आहेत तसेच त्यांच्या योजनांशी संबंधित आहेत ज्या ते भविष्यात करणार आहेत. अदानी फाऊंडेशनच्या स्वाभिमान उपक्रमाद्वारे सशक्तीकरण आणि लवचिकतेचे ज्वलंत चित्र रेखाटून दिप्ती दिनेश बोत्रे यांच्या जीवनात विलक्षण परिवर्तन झाले आहे. एकेकाळी अनुकरणाच्या कामात गुंतलेली दिप्ती, जेव्हा ती या परिवर्तनवादी उपक्रमाचा एक भाग बनली तेव्हा तिला तिच्या जीवनासाठी एक नवीन मार्ग सापडला. स्वाभिमानने आणलेले बदलाचे वारे ज्याने दिप्ती सेलची दिशा बदलली आहे. दिप्तीने आपला वेळ अनुकरण कार्यासाठी समर्पित केला, एक कला ज्याने तिच्या कुटुंबाला आधार दिला परंतु तिच्या मुलीच्या शिक्षणाची तिची आकांक्षा पूर्ण करण्यात ती कमी पडली. एक दृष्टी असलेली महिला म्हणून, दिप्तीने मर्यादा तोडून तिच्या बचत गटाच्या ताकदीचा फायदा घेण्याचे ठरवले.

अदानी फाऊंडेशनच्या स्वाभिमान उपक्रमाने दिप्तीच्या प्रवासात मोलाची भूमिका बजावली. आपल्या मुलीच्या भविष्यासाठी शिक्षणाचे महत्त्व ओळखून, दिप्तीने तिच्या साईशा उद्योजकीय महिला स्वयं-सहायता गटाकडून 15,000 रुपयांचे अंतर्गत कर्ज घेतले. हे आर्थिक पाठबळ केवळ व्यवहाराचे नव्हते; हे स्वयं-मदत गटामध्ये अंतर्भूत सामूहिक शक्ती आणि समर्थनाचे प्रतीक आहे, एक समुदाय जो एकमेकांच्या स्वप्नांवर विश्वास ठेवतो. कर्जामुळे सशक्त होऊन, दिप्तीने टेलरिंगच्या कामात स्वतःला झोकून दिले, ही एक कला तिने तिच्या पतीसोबत स्वीकारली. स्वाभिमान उपक्रम मात्र आर्थिक मदत देऊन थांबला नाही. कौशल्य विकास कार्यक्रमांद्वारे, दिप्तीने तिचे टेलरिंग कौशल्य सुधारले, तिच्या कामाची गुणवत्ता वाढवली आणि ती देऊ शकतील अशा सेवांची व्याप्ती वाढवली.

स्वाभिमान उपक्रमाचा प्रभाव दिप्तीच्या जीवनावर उमटला. तिने तिच्या पतीसोबत सुरू केलेला टेलरिंगचा व्यवसाय भरभराटीला आला आणि या जोडप्याने त्यांच्या मासिक कमाईत लक्षणीय वाढ पाहिली, जी आता 5000-6000 रुपयांच्या दरम्यान आहे. या नवीन आर्थिक स्थैर्याने केवळ तिच्या मुलीच्या शैक्षणिक आकांक्षा पूर्ण केल्या नाहीत तर दिप्तीला तिच्या कुटुंबाच्या कल्याणासाठी अधिक भरीव योगदान देण्यास

सक्षम केले. आर्थिक क्षेत्राच्या पलीकडे स्वाभिमान उपक्रम दिप्तीसाठी प्रेरणा आणि आत्मविश्वासाचा स्रोत बनला. ती केवळ एक कुशल म्हणून नाही तर सामाजिक अपेक्षांच्या पलीकडे स्वप्न पाहण्याचे धाडस करणारी महिला म्हणून उदयास आली.

साईशा उद्योजकीय महिला ग्रुपमधील पाठिंबा आणि सौहार्द, स्वाभिमान उपक्रमाद्वारे वाढवलेला, दिप्तीच्या आत्म-शोध आणि सक्षमीकरणाच्या प्रवासात एक प्रेरक शक्ती बनली. तिने तिच्या मुलीच्या शिक्षणाचाही विचार केला आहे ज्याने तिला नवीन सूर्यप्रकाशात आणले आहे जिथे तिला एक विलक्षण व्यक्तिमत्व प्राप्त होऊ शकते. त्यामुळे एका संधीत दोन महिलांना सक्षम बनवण्यात स्वाभिमानचा उपक्रम यशस्वी झाला आहे.



Scanned with OKEN Scanner

# 'मुली स्पर्धा, महिला सक्षमीकरण'



वर्षाला अदानी फाऊंडेशनच्या स्वाभिमान उपक्रमातून सक्षमीकरण मिळाले. कलाकुसर आणि सृजनाची आवड असलेल्या वर्षाला तिच्या विनम्र परिसराच्या सीमा ओलांडणारी स्वप्ने होती. स्वाभिमान पुढाकार तिच्या आकांक्षांसाठी उत्प्रेरक बनला, तिला एक मशीन किट ऑफर केली ज्यामुळे तिचे जीवन बदलले आणि तिला तिच्या कौशल्यांची कमाई करण्याची संधी मिळाली. स्वाभिमानच्या हस्तक्षेपापूर्वी वर्षा यांचे सर्जनशील प्रयत्न संसाधनांच्या कमतरतेमुळे मर्यादित होते. तिच्याकडे प्रतिभा आणि चालना होती, परंतु योग्य साधनांच्या अनुपस्थितीमुळे तिची क्षमता साकारण्यात अडथळा येत होता. तिचे समर्पण ओळखून, अदानी फाऊंडेशनच्या स्वाभिमान उपक्रमाने पाऊल उचले आणि वर्षाला तिच्या कलाकुसरीनुसार तयार केलेले शिलाई मशीन किट दिले.

वरवर साध्या वाटणाऱ्या या हावभावाचा वर्षा यांच्या आयुष्यावर खोलवर परिणाम झाला. शिलाई मशीन किटने तिच्या कामात केवळ कार्यक्षमता वाढवली नाही तर सर्जनशीलतेसाठी नवीन मार्ग देखील उघडले. तिच्या विल्हेवाटीत योग्य साधनांमुळे वर्षाची कलात्मक अभिव्यक्ती बहरली. तिने विविध प्रकारची उत्पादने तयार करण्यास सुरुवात केली, क्लिष्टपणे डिझाइन केलेल्या हस्तकलेपासून ते वैयक्तिकृत वस्तूंपर्यंत, सर्व काही अचूक आणि काळजीपूर्वक तयार केले. स्वाभिमानचा उपक्रम केवळ शिलाई मशीन किट देऊन थांबला नाही; त्यातून वर्षाला आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग मिळवुन दिला. तिच्या नवीन क्षमतांद्वारे, वर्षाने एक छोटासा व्यवसाय सुरू केला, तिच्या निर्मितीची समाजात आणि त्यापलीकडे विक्री केली. या उपक्रमामुळे तिला केवळ कमाईचे साधनच मिळाले नाही तर तिच्या कलाकुसरीबद्दल अभिमान आणि आत्मविश्वासही निर्माण झाला.

वर्षाची मासिक कमाई, आता सुमारे 3000 रुपये आहे, स्वाभिमान उपक्रमाचा केवळ आर्थिक प्रभावच नव्हे तर तिच्या जीवनातील व्यापक बदल दर्शवते. महत्त्वाकांक्षा असलेल्यांना योग्य संसाधने उपलब्ध करून देण्याची परिवर्तनशील शक्ती दाखवून या उपक्रमामुळे तिला तिची आवड उत्पन्नाच्या व्यवहार्य स्रोतात बदलण्यास सक्षम केले. आर्थिक बाबींच्या पलीकडे स्वाभिमानने वर्षा यांच्या आयुष्यात सक्षमीकरणाची बीजे पेरली आहेत. यापुढे मर्यादांनी मर्यादित न राहता, ती तिच्या समाजातील लवचिकता आणि सर्जनशीलतेचे प्रतीक बनली. एकेकाळी मर्यादित शक्यता असलेली स्वप्ने पाहणारी ती एक सशक्त स्त्री म्हणून विकसित झाली होती, ज्याने केवळ तिच्या घरगुती उत्पन्नातच नव्हे तर तिच्या सभोवतालच्या सांस्कृतिक समृद्धीतही योगदान दिले होते.



Scanned with OKEN Scanner

# विश्वासाला मार्ग अनेक

रुपाली तुकाराम माने गेल्या सहा ते सात वर्षांपासून महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत क्षितिज लोक संचलित साधन केंद्रामधून बचत गटाच्या योजनेचा फायदा घेत होत्या. आर्थिक परिस्थिती बरी होती. त्यामुळे गृहिणी म्हणून घर सांभाळण्या व्यतिरिक्त त्यांना घराबाहेर पडून काहीतरी करावं लागणार नव्हतं. पण रोज रोज तेच आयुष्य जगून कंटाळलेल्या रुपाली यांनी कुटुंबासाठी आयुष्य खर्ची घालताना स्वतःसाठी सुद्धा काहीतरी करायचं निर्णय घेतला.



माविम च्या सहयोगिनी यांच्यासोबत संवाद झाल्यानंतर त्यांनी बचत गटातून मिळणाऱ्या आर्थिक कर्जातून स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्या व्यवसायाला सुरुवात करण्या आधी त्यांनी रीतसर प्रशिक्षण घेतलं आणि अस्सल ग्रामीण काळे व पिवळे मनुके विक्रीचा व्यवसाय त्यांनी सुरू केला. व्यवसायात हवं तसं यश मिळत नव्हतं पण तरीही खचून न जाता त्यांनी प्रयत्न सुरूच ठेवले. यासोबतच त्यांनी जोडव्यवसाय म्हणून ग्रामीण मसाले बनवायला आणि विकायला सुरुवात केली. मसाल्यांना बाजारात असलेल्या मागणीचा त्यांना फायदा झाला. आयुष्याच्या रोजच्या तडजोडींनी गुरफटलेल्या रुपाली या हळू हळू पुन्हा नव्याने जगू लागल्या. कुटुंबा सोबतच स्वतःच्या गरजांचा विचार करू लागल्या.

त त्यांचे घरगुती जेवणाचे डबे, मसाले, सुका मेवा, मेथीचे लाडू व इतर फराळ तसेच पापड, मोदक यांसारखे ऋतुंनुसार किंवा सणांनुसर येणाऱ्या खात्यापदर्थांची ही विक्री करत नवीन नवीन प्रयोग करून पाहतायत. "व्यावसायिक म्हणून उभी राहण्याची धडपड पैसे कमावण्यासाठी म्हणून नव्हती फक्त, स्वतःला सिद्ध करण्या साठी आणि हरवलेल्या स्वतःला पुन्हा मिळवण्यासाठी होती." असं सांगताना त्यांच्या डोळ्यात दिसणारा आत्मविश्वास प्रत्येक स्त्रीच्या डोळ्यांत असला की आपल्या देशाची प्रगती ही आमच्या महिला वर्गाने साधली आहे हे जगाच्या पाठीवर कुठेही आपण बोलू शकतो ज्यावर माझा तरी पूर्ण विश्वास आहे.



Scanned with OKEN Scanner

# शहर की और

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर असमा यांचं लग्नं झालं. त्या त्यांच्या पतीच्या रहत्याघरी कामराज नगर, मुंबई येथे आल्या तेव्हा त्यांना शहरी जीवनाची मुळीच माहिती नव्हती. मुळातच बुजऱ्या स्वभावाच्या आसमा यांचा दिवस घरातच जाऊ लागला. जगाशी फार संबंधच नसल्याने त्यांना व्यावहारिक जगाविषयी नैराश्य निर्माण झालं. २०१५ वर्षात त्यांची कुण्या शेजारच्या महिलेशी ओळख झाली तेव्हा त्यांना महिला बचत गटाच्या योजनांची माहिती मिळाली. त्यांनी महिला बचत गटाचे सदस्यत्व घेतले वा त्यांचा महिला आर्थिक विकास महामंडळ सोबतचा प्रवास सुरू झाला.

सुरुवातीला महिलांची चर्चेत सहभाग घेण्यास घाबरणाऱ्या आसमा शेख हळू हळू त्यांच्यात मिसळू लागल्या. त्यांच्यात जगात वावरण्याचा, इतरांशी व्यवहार करण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला. बचत गटाच्या कामकाजात होणाऱ्या समस्या आता त्या सोडवू लागल्या आहेत. परिसरातील इतर महिलांनाही आता त्या घरातून बाहेर पडून आत्मनिर्भर बनण्यासाठी बचत गटात सामील होण्यासाठी प्रवृत्त करत आहेत.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या प्रतिनिधींशी संवाद साधल्या नंतर त्या आता घरगुती उद्योग करण्यासाठी प्रशिक्षण घेत आहेत. लवकरच त्या स्वतःचा व्यवसाय सुरु करतील. आणि एका बुजऱ्या स्वभावाच्या आसमा शेख यांना उद्योजिका आसमा शेख म्हणून समाज ओळखायला लागेल.



Scanned with OKEN Scanner

# सैर नव्या जगाची




सुशीला चंद्रकांत कूचेकर यांनी साधारण आठ वर्षांपूर्वी महालक्ष्मी महिला बचत गटाच्या माध्यमातून सुरुवात केली. दहा महिला सदस्य असलेल्या या बचत गटाला महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून मसाले बनवण्याचे प्रशिक्षण दिले गेले. कर्जस्वरुपात मिळालेल्या रकमेतून मसाले बनवण्या साथीचे सर्व साहित्य मिळवून मसाले बनवण्याची प्रक्रिया पूर्ण झाली. पण यानंतरही त्यांच्या समोर प्रश्न होता तो म्हणजे मसाले ग्राहकांपर्यंत पोहोचवायचे कसे?

क्षितिज ने राबवलेल्या उपक्रमांमध्ये हे मसाले विक्रीसाठी ठेवले गेले. घरची चव असलेले मसाले ग्राहकांना आवडू लागले. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या प्रतिनिधींकडून मसाले वितरित करण्याची अनेक माध्यमं वापरून अधिकाधिक ग्राहकांपर्यंत हे मसाले पोहोचवण्याचे प्रयत्न सुशीलाजी करू लागल्या.

सोसियल मीडिया प्लॅटफॉर्म वरून मसाल्यांची मागणी वाढू लागली तेव्हा महिला आर्थिक विकास महामंडळाच्या साहाय्याने त्यांना आणखी कर्ज मिळाले. त्यांनी आणखी मसाले उत्पादित करून व्यवसाय वृद्धिंगत करत नफा मिळवायला सुरुवात केला.

आज महालक्ष्मी महिला बचत गटाचे कर्ज संपून त्यांना नफा मिळत आहे. सुशीला चंदकांत कुचेकर यांची प्रगती पाहून त्यांच्या भोवतालच्या बऱ्याचश्या महिलांच्या मनात उद्योजिका म्हणून उभे राहण्याची अशा पल्लवित होत आहे. आर्थिक परिस्थितीला शरण गेलेल्या कित्येक महिलांसाठी आज सुशिलाजी आदर्श ठरत आहेत.



Scanned with OKEN Scanner

# प्रेरणा

मी सायन मुंबई मध्ये गेल्या १८ वर्षे पासून राहत आहे. माझ्या घरी आम्ही पाच जण राहतो. माझे मिस्टर आणि माझी दोन मुल आणि सासूबाई सोबत आम्ही आनंदाने राहत आहे. मी मुळची नाशिक जिल्हयातील असून लग्नानंतर आम्ही मुंबई येथे आलोत.

**व्यवसाय सुरू करण्याची प्रेरणा : -**




घरी बसून काहीतरी करवास वाटत होत. त्याच वेळी आमच्या येथे बॅग बनवण्याचे प्रशिक्षण चालू झाले होते. ते प्रशिक्षण मी घेतले आणि मला असे वाटले की त्यातूनच मला व्यवसाय सुरू करण्याची इच्छा निर्माण झाली आणि माझा स्वतःचा व्यवसाय सुरू केला.

**समस्या, उपाय आणि संधि**

व्यवसायाच्या सुरुवातीला जास्त ग्राहक नव्हते. त्यामुळे फारसे पैसे हि मिळत नव्हते.

सुरुवातील माझे प्रॉडक्ट मी खूप कमी किंमतीत विकले. त्यानंतर मी माझ्या प्रॉडक्ट मध्ये बदल केले. आणि सध्या माझ्या प्रॉडक्ट ची विक्री खूप आहे.

महिलांना सध्या वेगवेगळ्या पर्स ची आवड असते त्यानुसार मी माझ्या पर्स बनवते आणि मी स्वतःचा सर्व ठिकाणी मी बनवलेली पर्स घेऊन जाते जेणे करून मला नवीन ग्राहक भेटतील आणि माझ्या वस्तूचे मार्केटिंग होईल.



Scanned with OKEN Scanner





एकजुटीतून अवतरेल
समृद्धीची नवप्रभा

**MAVIM**
**माविम**

श्री साई रतन अपार्टमेंट, ब्लॉक नं. ५, तळ मजला, घाटकोपर (पूर्व), मुंबई – ४०००७७.
दूरध्वनी : ६५१३०११२/२५०१३००६ | Email : mavimghatkoparmumbai@gmail.com

Scanned with OKEN Scanner